# संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा तथा अग्निशमन सल्लागार कार्यालय

महाराष्ट्रातील महानगरपालिका / नगरपरिषदाच्या अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी **महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविण्यास** शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दि.३१.०८.२००९ अन्वये शासनाने मान्यता दिलेली आहे. या योजनेअंतर्गत शासनाने एकूण रु.२८५.०० कोटीचे मंजूर केले असून ते पुढील प्राधान्याने खर्च करण्यात येणार आहे.

**प्राथम्य क्र.१ :** राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम यासह ८ ब-वर्ग, ८१ क-वर्ग व २ नगरपंचायती ज्यांच्याकडे अजिबात अग्निशमन सेवा नाही त्या ठिकाणी अग्निशमन केंद्रे बांधणे व अग्निशमन वाहने उपलब्ध देण्यात येणार आहे. या कामासाठी एकूण रु. ८०.४५ एवढा खर्च अपेक्षित आहे.

**प्राथम्य क्र.२ :** प्रगत अग्निशमन अकादमीचा पहिला टप्पा व ७ अ-वर्ग, ४४ ब-वर्ग व ५५ क-वर्ग नगरपरिषदा व ३ नगरपंचायतींसाठी अग्निशमन केंद्रे बांधणे व अग्निशमन वाहने खरेदी करण्यात येणार असून यासाठी रु.१०५.८५ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

**प्राथम्य क्र.३ :** प्रगत अग्निशमन अकादमीचा दूसरा टप्पा, १६ महानगरपालिका, ८ अ-वर्ग, ९ ब-वर्ग, ६ क-वर्ग नगरपरिषदासाठी अग्निशमन केंद्रे बांधणे व अग्निशमन वाहने खरेदी करण्यात येणार असून यासाठी रु.९७.८० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. या योजनेत शासन, महानगरपालिका / नगरपरिषदांच्या हिश्श्याची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती | शासन अनुदानाची टक्केवारी | महानगरपालिका / नगर परिषदांच्या हिश्श्याची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका - ड वर्ग | ३५ % | ६५ % |
| २ | नगरपरिषदा - अ वर्ग | ५० % | ५० % |
| ३ | नगरपरिषदा - ब वर्ग | ७० % | ३० % |
| ४ | नगरपरिषदा - क वर्ग | ८० % | २० % |
| ५ | नगर पंचायत | ८० % | २० % |

सन २००९-१० या आर्थिक वर्षात वरील योजनेसाठी रु.४९.५९ कोटीचे अनुदान मंजूर झाले असून प्रथम टप्प्यातील ९१ नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांची बैठक **दि.१७.१२.२००९ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. श्री. मनु कुमार श्रीवास्तव, सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली राजा रघुजी भोसले सभागृह (नागपूर महापालिका टाऊन हॉल), महाल, नागपूर येथे आयोजित केली आहे.**

या बैठकीत नगरपरिषदांकडून अग्निशमन केंद्रे बांधण्यासाठी उपलब्ध होणाऱ्या जागेच्या अनुषंगाने चर्चा करुन त्याबाबत मा.सचिव-२, नगर विकास विभाग हे सर्व मुख्याधिकारी यांना मार्गदर्शन करणार आहेत.